सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
# सार्वजनिक आरोग्य विभाग,
# गट-क व ड संवर्गातील सरळसेवेने रिक्त पदे भरण्याबाबतची जाहिरात २०२३

## जाहीर प्रकटन

**विषय – उमेदवारांचे आक्षेप / तक्रारींचे सोडवणूक करणेकरिता तक्रार निवारण कक्षाची स्थापना करणेबाबत**

विभागाचे दिनांक २८/८/२०२३ रोजीच्या जाहिरातीस अनुसरुन दिनांक ३०/११/२०२३ ते ०७/१२/२०२३ व १२/१२/२०२३ रोजी झालेल्या ऑनलाईन परिक्षेच्या अनुषंगाने उमेदवारांकडून निकाल, निवड सुची व प्रतिक्षा सुची, शैक्षणिक अर्हता, सेवा प्रवेश नियम, सॅनिटरी इन्स्पेक्टर अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र, परराज्यातील/खाजगी विदयापीठ, समकक्ष शैक्षणिक अर्हता वगैरे संबंधी समुपदेशन समितीकडून घेतलेल्या निर्णयांच्या अनुषंगाने उमेदवारांनी त्या-त्या नियुक्ती प्राधिकारी स्तरावर खालीलप्रमाणे तक्रार निवारण कक्षाची (Grievance Redressal Cell) स्थापना करण्यात येत आहे.

**गट-क व ड संवर्गातील परिमंडळ / कार्यक्रम प्रमुख स्तर तक्रार निवारण कक्ष –**

| | |
|---|---|
| १) सहा.संचालक, आरोग्य सेवा (मुख्यालय) | … अध्यक्ष |
| २) मुख्य प्रशासकीय अधिकारी परिमंडळ | … सदस्य सचिव |
| ३) प्रशासकीय अधिकारी / अधिक्षक | … सदस्य |

तरी संबंधित उमेदवारांनी पदभरती संबंधी काही आक्षेप वा तक्रार असल्यास ज्या परिमंडळाच्या अधिनस्त कार्यालयाकडून गुणवत्ता यादीत दर्शविले आहे, त्या परिमंडळातील नियुक्ती प्राधिका-याकडे लेखी स्वरुपात समर्थनीय कागदपत्रांसह निवेदन सादर करावे. उमेदवारांनी थेट राज्यस्तरावर पदभरती संबंधी तक्रार/आक्षेप सादर करण्यात येऊ नये आणि जर उमेदवारांनी यापुर्वी निवेदन/आक्षेप सादर केले असल्यास त्याचा राज्यस्तरावर विचारात घेतले जाणार नाही.

तक्रार निवारण कक्षाने उमेदवारांचे तक्रार/आक्षेपांच्या अनुषंगाने ७ दिवसात संबंधित उमेदवारास लेखी स्वरुपात वस्तुस्थिती कळविण्यात यावी. तक्रार निवारण कक्षाने दिलेल्या माहितीने उमेदवाराचे समाधान न झाल्यास, उमेदवाराने तक्रार निवारण कक्षाने दिलेले माहितीच्या पत्रासह राज्यस्तरावरील recruitmentprocess२०२३@gmail.com या ईमेल आयडीवर अपील दाखल करावा.

<table>
<tr><td colspan="3">महाराष्ट्र शासन    आरोग्य सेवा संचालनालय,<br>पुणे कार्यालय, पुणे -४११ ००१</td></tr>
<tr><td>सहसंचालक आरोग्य सेवा<br>(हि.ह.व ज.रो.) दुरध्वनी क्रं.<br>कार्यालय दूरध्वनी क्र.</td><td>२६१२२२५६ (वै)<br>२६१२४२९९ (का)<br>२६१२५७९२ (का</td><td>संचालक, आरोग्य सेवा आयुक्तालय,<br>मध्यवर्ती इमारत, पहिला मजला, पुणे-४११ ००१.<br>ई-मेल ॲड्रेस : recruitmentprocess2023@gmail.com</td></tr>
<tr><td>आरोग्य सेवा</td><td colspan="2">जाक्र.ससंआसे/पदभरती/ तक्रार निवारण समिती/ १२००१-९६ /कक्ष-५२अ / न.क्र./२४, दिनांक- २७/३/२०२४</td></tr>
</table>

प्रति,
१) सहसंचालक, आरोग्य सेवा (हि.ह.व ज.रोग) पुणे-६/कुष्ठरोग,पुणे-६ / (अंधत्व) मुंबई
२) उपसंचालक, आरोग्य सेवा (परिवहन/प्रयोगशाळा/आमाजिआ) पुणे.
३) उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळे ... (सर्व)

**विषय - उमेदवारांचे गा-हाणी / तक्रारींचे सोडवणूक करणेकरिता यंत्रणा कार्यान्वित करणे.**

विभागाचे दिनांक २८/८/२०२३ रोजीच्या जाहिरातीस अनुसरुन दिनांक ३०/११/२०२३ ते ०७/१२/२०२३ व १२/१२/२०२३ रोजी झालेल्या ऑनलाईन परिक्षेच्या अनुषंगाने उमेदवारांकडून निकाल, निवड सुची व प्रतिक्षा सुची, शैक्षणिक अर्हता, सेवा प्रवेश नियम, सॅनिटरी इन्स्पेक्टर अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र, परराज्यातील/खाजगी विदयापीठ, समकक्ष शैक्षणिक अर्हता वगैरे संबंधी समुपदेशन समितीकडून घेतलेल्या निर्णयांच्या अनुषंगाने उमेदवारांकडून थेट या कार्यालयास तक्रारी प्राप्त होत आहेत. तसेच आपले कार्यालयाकडून देखील अशा प्रकरणांमध्ये मार्गदर्शनासाठी प्रस्ताव प्राप्त होत असतात. उमेदवारांचे तक्रारी व अधिनस्त कार्यालयाकडील मार्गदर्शन पर प्राप्त प्रस्तावावर कार्यवाही करण्यात बराच वेळ जातो.

काही उमेदवार वर नमूद बाबींच्या अनुषंगाने थेट मा.न्यायाधिकरण अथवा मा.न्यायालयात दावा / याचिका दाखल करीत असतात. वास्तविक नियुक्ती प्राधिकारी स्तरावर उमेदवारांचे गा-हाणी / तक्रारींच्या अनुषंगाने तक्रार निवारण कक्ष (Grievance Redressal Cell) कडून प्रथम तक्रारींचे उपाययोजना/ निवारण (Remedy) करणे अपेक्षित असते. तक्रार निवारण कक्षाकडून घेतलेल्या निर्णयाने समाधान न झाल्यास आणि/किंवा व्यथित झाल्यास, उमेदवार पुढे मा.न्यायाधिकरण अथवा मा.न्यायालयात दावा / याचिका करणे संयुक्तिक ठरते. तथापि अशी समुचित कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास येत आहे. भविष्यात पदभरती व निवड सुची संदर्भात न्यायालयीन प्रकरणे उदभवू नये म्हणून नियुक्ती प्राधिकारी स्तरावर खालीलप्रमाणे तक्रार निवारण कक्षाची (Grievance Redressal Cell) स्थापना करण्यात यावी.

| | |
|---|---|
| १) सहा.संचालक, आरोग्य सेवा (मुख्यालय) | ... अध्यक्ष |
| २) मुख्य प्रशासकीय अधिकारी परिमंडळ | ... सदस्य सचिव |
| ३)प्रशासकीय अधिकारी / अधिक्षक | ... सदस्य. |

उमेदवारांना वरील नियुक्ती प्राधिकारी स्तरावर तक्रार निवारण (Grievance Redressal Cell) कक्षाकडून घेतलेल्या निर्णयाच्या विरोधात अपील दाखल करावयाचे असल्यास आरोग्य सेवा आयुक्तालय, पुणे स्तरावरील खालील अपीलीय (Appeal Cell) कक्षाकडे अपील अर्ज दाखल करणेबाबत आपलेस्तरावरुन संबंधित उमेदवारांस कळविण्यात यावे. मा.संचालक, आरोग्य सेवा पुणे कार्यालय स्तरावर परस्पर कोणतेही तक्रार /निवेदन यापुढे विचारात घेतली जाणार नाही. तसेच या कार्यालयास मार्गदर्शनासाठी सादर केलेले प्रस्तावावर देखील वर नमुद तक्रार निवारण (Grievance Redressal Cell) कक्षाने शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सुचनांनुसार निर्णय घेण्यात यावा व तसे सर्व संबंधित उमेदवारांस अवगत करण्यात यावा.

१) सहसंचालक, आरोग्य सेवा (हि.ह. व ज.रोग) पुणे ... अध्यक्ष
२) मुख्य प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा संचालनालय पुणे ... सदस्य सचिव
३) प्रशासकीय अधिकारी आरोग्य सेवा संचालनालय पुणे ... सदस्य
४) अधिक्षक / सहा.अधिक्षक, आरोग्य सेवा संचालनालय पुणे ... सदस्य

RADHAKISHAN BABURAO PAWAR
Digitally signed by RADHAKISHAN BABURAO PAWAR
Date: 2024.03.27 17:24:18 +05'30'

**( डॉ.राधाकिशन पवार )**
**सह संचालक, आरोग्य सेवा**
**(हिवताप, हत्तीरोग व जलजन्य रोग) पुणे-१**

प्रत-
१) सहा.संचालक, आरोग्य सेवा (हिवताप) .... (सर्व)
२) जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय ... (सर्व)
३) अधिक्षक, प्रादेशिक मनोरुग्णालय पुणे/ठाणे/रत्नागिरी व नागपूर.

प्रत माहितीस्तव सादर-
मा.आयुक्त, आरोग्य सेवा मुंबई.
मा.अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई. (सेवा-५)